# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. ३३/२०२६

विषय : दि.१४/०६/२००६ पूर्वी विहीत निवड समितीमार्फत संयुक्त व विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेल्या एम.फिल. धारक अध्यापकांना नेट अर्हतेमधून सूट मिळण्यासाठीचे प्रस्ताव सादर करणेबाबत.

संदर्भ : शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र संदर्भ क्र.उशिस/संकिर्ण/एम.फिल./२०२५/विशि/ई—७४८२५८ दि.०५/०३/२०२६

विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ५ सप्टेंबर, २००९ रोजीच्या पत्रान्वये दि. १४/०६/२००६ पूर्वी विहीत निवड समितीच्या माध्यमातून नियुक्त झालेल्या व ज्या अर्हताधारकांना विद्यापीठाने नियमित मान्यता दिलली आहे तसेच ज्यांनी सेवेत असताना दि. १जानेवारी, १९९४ ते दि. ११ जुलै २००९ या कालावधीत एम.फिल. हि अर्हता धारण केलेली आहे. अशा अध्यापकांना नेट अर्हतेमधून सूट मिळवण्यासाठीचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर करायचे आहेत.

तरी दि. १४ जून, २००६ पूर्वी विहीत निवड समितीद्वारे नियुक्त एम. फिल अर्हताधारक अध्यापक ज्यांना विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे. तसेच ज्यांनी दि. १ जानेवारी, १९९४ ते दि. ११ जुलै २००९ या कालावधीत एम.फिल. हि अर्हता धारण केलेली आहे व ज्यांना नेट अर्हतेमधून अद्याप विद्यापीठ अनुदान आयोगाने सूट दिलेली नाही अशा अध्यापकांचे प्रस्ताव दि. २० मार्च, २०२६ पर्यंत विद्यापीठातील शैक्षणिक मान्यता विभागाकडे सादर करावेत.

सदर प्रस्तावासोबत संबंधित अध्यापकांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावीत.

१. मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या कडून प्राप्त झालेली पद मान्यता.
२. बिंदू नियमावली
३. जाहिरात
४. निवड समिती अहवाल
५. नियुक्ती आदेश
६. रूजू अहवाल
७. शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे (उदा.पदवी, पदव्युत्तर पदवी, एम.फिल. गुणपत्रिका व पदवी इ.)
८. शिक्षक मान्यता प्रत

सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी वरील सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती, प्रत्येक अध्यापकांचा स्वतंत्र प्रस्ताव याप्रमाणे विहित वेळेत सादर करावा.

11/3/2026

गणेशखिंड, पुणे— ४११ ००७
जावक क्र.: सीसीओ/१३७१
दि.: ११/०३/२०२६
शिक्षक मान्यता कक्ष

स.द.डावखर
उपकुलसचिव,
अतिरीक्त कार्यभार

प्रत: मा. प्राचार्य, सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये.